**MHKO050030972021**

**नियमित दिवाणी दावा क्र.२०७/२०२१ मधील**
**निशाणी क्र.३१ खालील आदेश**
**चांदू ओमाना कांबळे विरुध्द पांडुरंग ओमाना कांबळे**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१,५ ते ८ यांनी दाखल केला असून त्यांच्या अर्जानूसार प्रतिवादी यांना सदर कामी समन्स लागू झाले आहेत. तथापि त्यांना कोर्टात हजर राहून मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. त्यामूळे सदर प्रतिवादी यांच्या विरुध्द नो डब्ल्यू एस व नो से चा आदेश पारित झाला आहे. प्रस्तूत प्रतिवादी यांना कागदपत्रे न मिळाल्याने कैफियत व मनाई अर्जास म्हणणे देता आले नाही. प्रतिवादी यांनी जाणून बुजून व हेतूपूरस्सरपणे कधीही कैफियत व म्हणणे देण्यामध्ये टाळाटाळ केलेली नव्हती व नाही. प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला नो से व नो डब्ल्यू एस चा आदेश रद्दबातल होवून कैफियत व म्हणणे देणेस झालेला विलंब माफ होवून प्रतिवादी यांना याकामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी, अशी त्यांनी विनंती केली आहे.

२. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार यातील प्रतिवादी क्र.१,३,५ यांना समन्स १० जानेवारी २०२२ रोजी पूर्वी लागू झालेले आहेत. १,५,८ यांच्या विरुध्द दि.२८/०३/२०२२ रोजी नोडब्ल्यूएसचा आदेश झालेला आहे. तेव्हा पासून दि.२९/०८/२०२२ अखेर प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली नाही. सदरचा अर्ज मूदत बाहय आहे. अर्जातील कारणे योग्य नाहीत. सुमारे ८ महिन्यांच्या काळात सदर प्रतिवादीनी कैफियत का दिली नाही याबाबत संयुक्तीक कारणे अर्जात दिसून येत नाही. करीता अर्ज नांमजूर करण्यात यावा. अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांना ५,०००/- कॉस्ट करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. दाव्यातील अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, सदर दाव्यात प्रतिवादी यांनी वेळेत कैफियत व म्हणणे सादर केले नाही. त्यामूळे सदर दावा विना कैफियत चालावा असा आदेश पारित झाला आहे. परंतू सदरचा दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता तसेच नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन तसेच अर्जातील नमूद कारणे विचारात घेवून प्रतिवादी यांना संधी देणे न्यायोचित ठरेल. सदर प्रकरणात प्रतिवादी यांनी कैफियत देण्याकरीता विलंब केला असल्याने त्या करीता त्यांना कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१,५ ते८ यांनी वादी यांना वैयक्तीक व संयूक्तीकरीत्या रक्कम रुपये १,०००/- इतकी कॉस्ट दयावी. त्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2023.07.07 15:10:38 +0530

**ठिकाण - इचलकरंजी** **(एम.एम.चौधरी )**
**दिनांक - ०६/०७/२०२३** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, इचलकरंजी.**